**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. आदम बाबालाल नदाफ — अपीलकर्ता
हरी पार्क, रि.स.नं. २/९, प्लॉट नं ९, आर. के. नगर रोड,
मु.पो. पाचगाव, ता. करवीर, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि., ग्रा.वि. २ कागल, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि., उपविभाग कागल, ता. कागल, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक २७.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि., ग्रा.वि. २ कागल, कोल्हापूर श्री.अशोक विष्णू शिंदे

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.,
उपविभाग कागल, ता. कागल, जि. कोल्हापूर
विद्यमान-श्री.नितीन बाबासाहेब धुमाळ तत्कालीन-श्री.शशांक रघुवीर इनामदार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक २६.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक २४.४.२००८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक | १६.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक | --- |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**
पाचगांव, हरीपार्क रि. स. नं.२/९, प्लॉट नं. ९ ते १३ बांधकामाकरीता देण्यात आलेल्या मीटर संदर्भातील आदेशाची प्रत व त्याबाबतच्या अटी व तदनुषंगिक एकूण ६ मुद्दे.

## विवेचन

आपल्या स्वत:च्या घरगुती वीज कनेक्शनसंबंधीची माहिती विलंबाने, अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरून आपण जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी लि., उपविभाग कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यांच्याविरूध्द राज्य माहिती आयोगाकडील अपिलात तक्रार केली होती. परंतु आपल्याला समाधानकारक माहिती मिळाली असून तक्रार राहिलेली नाही, अपील निकाली काढावे, असे विनंतीपत्र अपीलकर्ता श्री.आदम बाबालाल नदाफ यांनी आयोगाला सादर केले. जन माहिती अधिकारी तथा अभियंता, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी लि., उपविभाग कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.नितीन बाबासाहेब धुमाळ व अपिलीय प्राधिकारी अभियंता, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी लि., ग्रा.वि.२ कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.अशोक विष्णू शिंदे यांनी या पत्राच्या प्रतीसह तशाच आशयाचे निवेदन केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१२.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर बाळगोंडा पाटील (सुळकुड)
मु.पो.क|| सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

---

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शंकर बाळगोंडा पाटील (सुळकुड)
मु.पो.क|| सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.मुळे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.एन.व्ही.कल्याणकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.३.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१८.१२.२००८ रोजी घेण्यात आली.

आपल्या जमिनीतील झाडे तोडल्यासंबंधात नुकसानभरपाईसाठी आपण तक्रार दाखल केली. त्यावर जाबजबाब झाले व पंचनामा झाला. परंतु शासनाकडून अथवा झाडे तोडणाऱ्या कंपनीकडून आपल्याला कोठलीही नुकसानभरपाई मिळाली नाही. जमीन आपली असताना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता, अन्य कंपनीच्या नावे फेरफार उतारा केला गेला आहे. त्याबाबत चौकशी करून दोषी असणाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शंकर बाळगोंडा पाटील (सुळकुड) यांनी केली.

संबंधित प्रकरणातील उपलब्ध असणारी सर्व कागदपत्रे श्री.पाटील यांना दाखविण्यात आली. संबंधित संचिकेत पंचनाम्याची कागदपत्रे नसल्यामुळे ती दिली नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, करवीर श्री.एन.व्ही.कल्याणकर यांनी केले.

श्री.पाटील यांच्या जमिनीच्या संदर्भात नावाबाबतची चूक दुरूस्त केलेल्या नोंदीची प्रत दोन दिवसांत त्यांना द्यावी, खोटी कागदपत्रे केल्याची त्यांची तक्रार असून त्याबाबत अपिलीय प्राधिकारी

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही. त्यामुळे मूळ प्रकरणातील जन माहिती अधिकारी श्री. शत्रुघ्न नागेश शिरोडकर यांचे उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. शत्रुघ्न नागेश शिरोडकर यांनी केलेली कृती ग्राह्य धरण्यात येत आहे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचा मूळ प्रकरणातील निर्णय रद्द करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १७.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शिवाजी आनंदा कापसे
मु.पो. रेठरे धरण, ता.वाळवा, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६६ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.८.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. शिवाजी आनंदा कापसे<br>मु.पो. रेठरे धरण, ता.वाळवा, जि. सांगली<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>जिल्हा परिषद, सांगली श्री. एन. एल. पुरोहित | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.५.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.६.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण दि. ५.५.२००७ रोजी अर्ज केला. कळविलेले शुल्क जन माहिती अधिकाऱ्यांनी भरुन घेतले नाही. प्रथम अपिलाची सुनावणी झाली नाही व तीन महिन्यांनी दि. २८.८.२००८ ला माहिती नेण्याबाबत कळविले, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. शिवाजी आनंदा कापसे यांनी केले. श्री. कापसे यांचा अर्ज दि. १४.५.२००७ रोजी आपल्याला प्राप्त झाला. दि. २८.५.२००७ च्या पत्रान्वये त्यांना शुल्क कळविले. त्यांनी शुल्क भरले नाही. दि. १२.६.२००७ रोजी प्रथम अपील सादर केल्यानंतर तयार असलेली माहिती पाहिली. त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती उपलब्ध असून हवी असलेली माहिती त्यांना निःशुल्क देता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी डॉ. बी.एम.पाटील यांनी केले. श्री. कापसे यांना टपालाने माहिती पाठविण्यात आल्याचे पत्रात आपण नमूद केले होते. परंतु आपण दि. २८.८.२००८ रोजी समक्ष येणार असल्याचे श्री. कापसे यांनी दूरध्वनीवरुन कळविल्यामुळे माहिती प्रत्यक्षात न पाठविता तयार ठेवली. मात्र श्री. कापसे यांनी त्या दिवशी स्वीकारली नाही. दि. ३०.८.२००८ रोजी आयोगापुढील सुनावणीच्या वेळी त्यांनी ती स्वीकारली, असा लेखी खुलासा जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी डॉ. बी. एम. पाटील यांनी केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३० .११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

सौ.उज्वला बबन वेटम
प्रतिक अपार्टमेंट, फ्लॅट ११, प्लॉट नं.१८/१८,
दक्षिण शिवाजीनगर, शिवेच्छा हॉटेल नजीक,
जि.सांगली **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस मुख्यालय सांगली,
जि.सांगली **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,
शहर विभाग सांगली, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७७ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.०६.२००९ |
| **३.** | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** - सौ.उज्वला बबन वेटम
प्रतिक अपार्टमेंट, फ्लॅट ११, प्लॉट नं.१८/१८, दक्षिण शिवाजीनगर
शिवेच्छा हॉटेल नजीक, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस मुख्यालय सांगली,
जि.सांगली श्री.बाळासाहेब वाघमोडे

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,
शहर विभाग सांगली, जि.सांगली श्री.निकेश खारमोडे-पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.०३.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.०३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०३.०७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०१.०८.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-अर्जाच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्त्या सौ.उज्वला बबन वेटम यांनी मागितलेली माहिती व्यक्तिशः पाठविली. त्या पत्त्यावर घरी कोणी नसल्यामुळे टपालाने पाठविली. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांच्याकडील चौकशीची कागदपत्रे असा उल्लेख त्यांनी केला होता. परंतु अहवालाची प्रत मिळण्याबाबत स्पष्टपणे नमूद केले नव्हते, त्यामुळे ती देण्यात आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग सांगली, जि.सांगली श्री.निकेश खारमोडे-पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस मुख्यालय सांगली, जि.सांगली श्री.बाळासाहेब वाघमाडे यांनी केले.

सौ.वेटम यांनी गृहमंत्र्यांकडे केलेल्या तक्रारीबाबतच्या चौकशीच्या अहवालाची प्रत त्यांना देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.२४.०६.२००९ रोजी चौकशीअहवालाची प्रत सौ.वेटम यांना पाठविण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस मुख्यालय सांगली,जि.सांगली श्री.बाळासाहेब वाघमोडे यांनी संबंधित अहवालाच्या प्रतीसह आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : २७/११/२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर
ओंकार-३१, अंमली कॉलनी, गेंडामाळ, शाहूपूरी, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना,
वरळी दुग्धशाळा, वरळी सी फेस, मुंबई-१८ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जनसंपर्क अधिकारी,
दुग्धव्यवसाय विकास विभाग, आयुक्त कार्यालय, वरळी, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर
ओंकार-३१, अंमली कॉलनी, गेंडामाळ, शाहूपूरी, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना,
वरळी दुग्धशाळा, वरळी सी फेस, मुंबई-१८ प्रतिनिधी श्री.सी.एस.चौगुले
**जन माहिती अधिकारी** तथा जनसंपर्क अधिकारी,
दुग्धव्यवसाय विकास विभाग, आयुक्त कार्यालय, वरळी, मुंबई श्री.सी.एस.चौगुले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर असल्याने दि.२१.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती अपूर्ण मिळाली. प्रथम अपिलाची दखलही घेतली गेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर यांनी केली. पाचपैकी चार मुद्दयांची माहिती देण्यात आल्याचे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा दुग्धशाळा अभियंता, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी दुग्धशाळा, मुंबई श्री.सी.एस.चौगुले यांनी केले. एका मुद्दयातील पत्राची प्रत उपलब्ध करून आठ दिवसात देण्यात यावी, असे मौखिक आदेश आयेगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता करण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा दुग्धशाळा अभियंता, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी दुग्धशाळा, मुंबई श्री.सी.एस.चौगुले यांनी दि.२७.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिल सिताराम सुबंध
मु.पो.वडगाव-निंबाळकर, ता.बारामती, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६.११.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. सुनिल सिताराम सुबंध
मु.पो.वडगाव-निंबाळकर, ता.बारामती, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. प्रदिप वि. गुरव

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.४.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.५.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.५.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.६.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्री. बाळासाहेब लक्ष्मण धुमाळ यांनी दि. ३०.८.२००९ रोजी दिलेल्या जातीच्या दाखल्याची प्रत आपल्याला मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सुनिल सिताराम सुबंध यांनी केली.

संबंधित माहिती संस्थास्तरावरील असल्यामुळे स्वातंत्र्य विद्यामंदिर व न्यू ज्युनियर कॉलेज वडगाव-निंबाळकर, ता. बारामती, जि. पुणे या शाळेकडे विचारणा करण्यात आली. त्यानुसार शाळेकडील माहिती श्री. सुबंध यांना देण्यात आली. सुमारे ३० वर्षांपूर्वीच्या जात पडताळणीच्या परवान्याची प्रत आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही, तसेच जात पडताळणी विभागाने या संदर्भात अपीलकर्त्याची मागणी अमान्य केलेली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी केले.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांच्या दि.३०.८.१९७९ च्या पत्रान्वये विशिष्ट प्रभागामध्ये मोडत असलेली जात अनेक शिक्षण संस्थांनी अनुसूचित जमातीमध्ये वर्ग केली व परिणामी हजारो पात्र विद्यार्थी शासकीय नोकऱ्या व विविध योजनांपासून वंचित राहिले. त्याबाबत चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई होणे आवश्यक आहे, अशी श्री. सुबंध यांची मागणी आहे. ही बाब प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. बाबासाहेब भरमू बारवाडे
रा. कुरूंदवाड, ता. शिरोळा, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, शिरोळ, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
कुरूंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. बाबासाहेब भरमू बारवाडे
रा. कुरूंदवाड, ता. शिरोळा, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
कुरूंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर सौ.आसावरी चंद्रकांत कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.६.२००८ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ६.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

कर्ज प्रकरणाची संपूर्ण कागदपत्रांसह माहिती आपण मागितली होती. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ यांच्या आदेशानंतरही जन माहिती अधिकारी तथा सचिव, धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कुरूंदवाड, ता.शिरोळ, यांनी ती दिली नाही, त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. बाबासो भरमू बारवाडे यांनी केली. श्री. बारवाडे हे वारंवार माहिती मागत असतात. वेळोवेळी ती त्यांना देण्यात आली आहे. संस्थेच्या बदनामीसाठी माहितीचा विपर्यास करुन ते वापर करतात. ते थकीत कर्जदार असून त्यांच्यावर न्यायालयात दावा चालू आहे. शिवाय फौजदारी गुन्हाही दाखल आहे. तथापि अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली होती, ती त्यांनी स्वीकारली नाही. तसे वेळीच सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ यांना कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव, धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कुरूंदवाड, सौ. आसावरी चंद्रकांत कुलकर्णी यांनी लेखी व तोंडी केले. नागरी सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, तरीही माहिती दिली, असेही त्यांनी नमूद केले.

नागरी सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही. तरीही धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कुरूंदवाड, पतसंस्थेने माहिती देऊ केली हे उल्लेखनीय आहे. माहिती न स्वीकारता ती न मिळाल्याची तक्रार करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही, त्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. २७.११.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. बाबासाहेब भरमू बारवाडे
रा. कुरूंदवाड, ता. शिरोळा, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, शिरोळ, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
कुरूंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. बाबासाहेब भरमू बारवाडे
रा. कुरूंदवाड, ता. शिरोळा, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
कुरूंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर सौ.आसावरी चंद्रकांत कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.६.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ६.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

कर्ज प्रकरणाची संपूर्ण कागदपत्रांसह माहिती आपण मागितली होती. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ यांच्या आदेशानंतरही जन माहिती अधिकारी तथा सचिव, धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कुरूंदवाड, ता.शिरोळ, यांनी ती दिली नाही, त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. बाबासो भरमू बारवाडे यांनी केली. श्री. बारवाडे हे वारंवार माहिती मागत असतात. वेळोवेळी ती त्यांना देण्यात आली आहे. संस्थेच्या बदनामीसाठी माहितीचा विपर्यास करुन ते वापर करतात. ते थकीत कर्जदार असून त्यांच्यावर न्यायालयात दावा चालू आहे. शिवाय फौजदारी गुन्हाही दाखल आहे. तथापि अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली होती, ती त्यांनी स्वीकारली नाही. तसे वेळीच सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ यांना कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव, धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कुरूंदवाड, सौ. आसावरी चंद्रकांत कुलकर्णी यांनी लेखी व तोंडी केले. नागरी सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, तरीही माहिती दिली,असेही त्यांनी नमूद केले.

नागरी सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही. तरीही धन्वंतरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कुरूंदवाड, पतसंस्थेने माहिती देऊ केली हे उल्लेखनीय आहे. माहिती न स्वीकारता ती न मिळाल्याची तक्रार करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही, त्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २७.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय दिनकर गाडेकर
शाहूनगर, नवीन कमानीजवळ, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, कणेरीवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.ओ.के.गहाणे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, कणेरीवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.शिवाजी परसू कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.७.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.संजय दिनकर गाडेकर यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. माहिती अपुरी असल्याच्या कारणावरून त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांच्याकडे अपील केले होते. सुनावणीच्या दोन तारखा देऊनही ते उपस्थित राहिले नाहीत व दिलेली माहिती योग्य असल्यामुळे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'ला व राज्य माहिती आयोगापुढील सुनावणीलाही अपीलकर्ता गैरहजर होते, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कणेरीवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.शिवाजी परसू कांबळे यांनी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि.३०.११.२००९

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय दिनकर गाडेकर
शाहूनगर, नवीन कमानीजवळ, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, कणेरीवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.ओ.के.गहाणे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, कणेरीवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.शिवाजी परसू कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.७.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.संजय दिनकर गाडेकर यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. माहिती अपुरी असल्याच्या कारणावरून त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांच्याकडे अपील केले होते. सुनावणीच्या दोन तारखा देऊनही ते उपस्थित राहिले नाहीत व दिलेली माहिती योग्य असल्यामुळे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'ला व राज्य माहिती आयोगापुढील सुनावणीलाही अपीलकर्ता गैरहजर होते, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कणेरीवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.शिवाजी परसू कांबळे यांनी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

सौ.वनलता भानुदास क्षीरसागर
१४५/०१/९-ए, जिजाऊ, १ ला मजला,
फ्लॅट नं.२, गारमाळ, धायरी, ता.हवेली, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
पुणे जिल्हा परिषद, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकीय अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र अडिवरे,
ता.आंबेगाव, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८७/२००९ / पुणे |
| २ | **संदर्भ क्रमांक :** राज्य माहिती आयोगाचे समक्रमांकाचे दि.२२.०७.२००९ चे आदेश | |

**सुधारित आदेश**

सौ.वनलता भानुदास क्षीरसागर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२२.०७.२००९ रोजी पारित करण्यात आलेल्या आदेशामध्ये अंशत: बदल करण्यात येत आहे सदर आदेशामध्ये जन माहिती अधिकारी म्हणून वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, खानापूर,ता.हवेली, जि.पुणे यांचा नामोल्लेख करण्यात आलेला आहे.

परंतु श्री.भानुदास यशवंत क्षीरसागर यांची बदली प्राथमिक आरोग्य केंद्र, आडिवरे, ता.आंबेगाव, जि.पुणे येथे झाल्याने त्यांना दि.४.११.२००४ रोजी कार्यमुक्त करण्यात आले. असल्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या संदर्भीय आदेशाची कार्यवाही प्राथमिक आरोग्य केंद्र खानापूर, ता.हवेली या कार्यालयास करता आली नाही. श्री.क्षीरसागर यांची बदललेली वेतनश्रेणी तसेच

मिळालेली आगाऊ वेतनवाढ व त्यानुषंगाने श्री.क्षीरसागर यांना अदा करावयाच्या फरकाच्या रकमेसाठी आवश्यक असलेले ना-देय प्रमाणपत्र श्री. क्षीरसागर यांचे मागणीनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र खानापूर, ता.हवेली या कार्यालयाकडून जानेवारी, २००८ मध्ये वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र आडिवरे, ता.आंबेगाव जि.पुणे यांना पाठविण्यात आले असून आता पुढील कार्यवाही वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र आडिवरे, ता.आंबेगाव जि.पुणे यांचेकडून होणे अपेक्षित असल्याची बाब आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र खानापूर, ता.हवेली यांनी दि.२.०९.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन संदर्भीय आदेशामध्ये नमूद केलेल्या जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, खानापूर, ता.हवेली, जि.पुणे ऐवजी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, आडिवरे,ता.आंबेगाव, जि.पुणे अशी सुधारणा करण्यात येत असून संदर्भाधीत आदेशात नमूद केलेले निष्कर्ष व आदेश कायम समजण्यात यावेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : २३ / ११/२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी शामराव काशीद
शिवाजीनगर, वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक महासंचालक (साखर),
पुणे विभाग, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना लि.दहिटणे,
ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी शामराव काशीद
शिवाजीनगर, वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.११.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.एस.आर.धाबेकर यांचे वाहन व त्यांना दिलेले निवासस्थान याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना लि.दहिटणे, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही अपुरी माहिती मिळाली. त्यामुळे संबंधितांवर कारवाई व्हावी व आपल्याला नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शिवाजी शामराव काशीद यांनी केली. श्री.काशीद यांनी मागितलेली माहिती शुल्क भरल्यानंतर देण्यात आली. तपशीलवार माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, शिवाजीनगर, पुणे यांनी दिला. त्यानुसार संपूर्ण माहिती देण्यात आली, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना लि.दहिटणे, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.डि.एस.जोगदे यांनी पूरक कागदपत्रांसह 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केले.

कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.शाहूराजे रामभाऊ धाबेकर हे कारखान्याने दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्य ठिकाणी राहतात. वाहन खाजगी कामासाठी वापरतात. त्यामुळे त्याविरूध्द आपण तक्रार केली असून ही माहिती त्यांच्याशी संबंधित आहे, असे प्रतिपादन श्री.काशीद यांनी केले. मात्र या तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. संबंधित माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली आहे. या प्रती साक्षांकित नसल्याची तक्रार, तसेच मानसिक त्रासामुळे आपण कामावर जाऊ शकत नसल्यामुळे आपले लाखो रूपयांचे नुकसान होत असून त्यापोटी एक लाख रूपये व अपिलाच्या खर्चापोटी ५००० रूपये अशी भरपाई मिळावी, अशी मागणी श्री.काशीद

यांनी आयोगाला सादर केलेल्या दि.२५.३.२००९ च्या पत्रान्वये केली. ती अमान्य करण्यात येत आहे. मात्र माहिती प्रमाणित करून त्यांना दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा संचालक (साखर), पुणे विभाग, शिवाजीनगर, पुणे यांनी अपीलकर्ता श्री.शिवाजी शामराव काशीद यांना संबंधित माहिती प्रमाणित करून दिल्याचा अहवाल दि.२०.१२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

पुणे
दि३०.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाबुराव ज्ञानदेव पाटील
नायगाव पोलीस मुख्यालय, चाळ नं.४, दुसरा मजला,
खोली नं.४५, दादर, नायगांव, मुंबई -१४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे शिवारे,
पो.आकुर्ले, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाबुराव ज्ञानदेव पाटील
नायगाव पोलीस मुख्यालय, चाळ नं.४, दुसरा मजला,
खोली नं.४५, दादर, नायगांव, मुंबई -१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.एन.के.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे शिवारे,
पो.आकुर्ले, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.यु.व्ही.साळुंखे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.४.२०८ व १३.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ---- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्याने दि.२८.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या नावे असलेल्या मिळकतीच्या संदर्भातील योग्य माहिती आपल्याला दिली जात नाह. घराचे छप्पर जमीनदोस्त झाले असताना घर उभे आहे व त्यावर छप्पर आहे, अशी माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मौजे शिवारे, पो.आकुर्ले, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर यांनी दिली आहे. खरेदी दस्ताप्रमाणे भावाचे नाव कमी करून आपले नाव लावण्याबाबतही चालढकल करण्यात आली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.बाबूराव ज्ञानदेव पाटील यांनी केली.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा पंचनामा तलाठ्याने केलेला आहे. पडझडीबाबतचा कोणताही अहवाल ग्रामपंचायतीकडे आलेला नाही व तसा अर्जही कोणी केलेला नाही. अर्ज दिला तरच तशी नोंद होते, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मौजे शिवारे, पो.आकुर्ले, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.यु.व्ही.साळुंखे यांनी केले. श्री.पाटील यांचा मूळ तक्रार अर्ज त्यांनी वेळोवेळी केलेले अर्ज व किमान चारवेळा त्यांना देण्यात आलेली माहिती, त्यांनी आवश्यक दस्त सादर केल्यानंतर केलेली फेरफार नोंद आदी सर्व माहिती श्री.पाटील यांना वेळोवेळी देण्यात आली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत

समिती शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.एन.के.पाटील यांनी लेखी व तोंडी विस्ताराने नमूद केले. दिलेल्या माहितीच्या प्रती त्यांनी सादर केल्या.

अपीलकर्ता श्री.पाटील यांना माहिती देण्यात आली आहे. घराच्या पडझडीच्या पंचनाम्याची माहिती अपीलकर्त्यास तहसीलदारांडून प्राप्त होऊ शकेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे

---

पुणे
दि.२७.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाबुराव ज्ञानदेव पाटील
नायगाव पोलीस मुख्यालय, चाळ नं.४, दुसरा मजला,
खोली नं.४५, दादर, नायगांव, मुंबई -१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे शिवारे,
पो.आकुर्ले, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाबुराव ज्ञानदेव पाटील
नायगाव पोलीस मुख्यालय, चाळ नं.४, दुसरा मजला,
खोली नं.४५, दादर, नायगांव, मुंबई -१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.एन.के.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे शिवारे,
पो.आकुर्ले, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.यु.व्ही.साळुंखे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.४.२०८ व १३.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ---- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्याने दि.२८.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या नावे असलेल्या मिळकतीच्या संदर्भातील योग्य माहिती आपल्याला दिली जात नाह. घराचे छप्पर जमीनदोस्त झाले असताना घर उभे आहे व त्यावर छप्पर आहे, अशी माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मौजे शिवारे, पो.आकुर्ले, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर यांनी दिली आहे. खरेदी दस्ताप्रमाणे भावाचे नाव कमी करून आपले नाव लावण्याबाबतही चालढकल करण्यात आली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.बाबूराव ज्ञानदेव पाटील यांनी केली.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा पंचनामा तलाठ्याने केलेला आहे. पडझडीबाबतचा कोणताही अहवाल ग्रामपंचायतीकडे आलेला नाही व तसा अर्जही कोणी केलेला नाही. अर्ज दिला तरच तशी नोंद होते, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मौजे शिवारे, पो.आकुर्ले, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.यु.व्ही.साळुंखे यांनी केले. श्री.पाटील यांचा मूळ तक्रार अर्ज त्यांनी वेळोवेळी केलेले अर्ज व किमान चारवेळा त्यांना देण्यात आलेली माहिती, त्यांनी आवश्यक दस्त सादर केल्यानंतर केलेली फेरफार नोंद आदी सर्व माहिती श्री.पाटील यांना वेळोवेळी देण्यात आली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत

समिती शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर श्री.एन.के.पाटील यांनी लेखी व तोंडी विस्ताराने नमूद केले. दिलेल्या माहितीच्या प्रती त्यांनी सादर केल्या.

अपीलकर्ता श्री.पाटील यांना माहिती देण्यात आली आहे. घराच्या पडझडीच्या पंचनाम्याची माहिती अपीलकर्त्यास तहसीलदारांडून प्राप्त होऊ शकेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे

**पुणे**
**दि.२७.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. सावळेराम जबाजी पाडेकर
मु. पो. संतवाडी (आळे),
ता. जुन्नर, जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी**
बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आळे, ता. जुन्नर, जि. पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आळे, ता. जुन्नर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९३ / २००९ / पुणे |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.२.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.४.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - शैक्षणिक वर्ष १९९९-२००० ते २००३-२००४ या कालावधीत वाणिज्य शाखेतील वर्गनिहाय कार्यभार किती आहे. सन १९९९-२००० ते २००३-२००४ या कालावधीत वाणिज्य शाखेत शिकविलेल्या विषयांची वर्गनिहाय व वर्षनिहाय यादी, या कालावधीत किती विषय व वर्ग बंद करण्यात आले, कोणत्या परिनियमानुसार बंद करण्यात आले, असे करताना महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९० विद्यापीठ परिनियम (स्ट्रॅट्युट) यांनी वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करण्यात आले नसल्यास त्याबाबतचा खुलासा. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सावळेराम जबाजी पाडेकर यांनी प्राप्त माहितीने समाधान न झाल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दरम्यान काळात अपेक्षित माहिती प्राप्त झाल्याने आपले समाधान झाले असल्याने सदर अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दिनांक ८.९.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविलेल्या पत्राची प्रत अपिलीय प्राधिकारी बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, यांनी दिनांक ९.९.२००९ रोजीच्या पत्रासोबत आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२१-११-२००९